# नियुक्त्या
# मुंबई येथील उच्च न्यायालयाचा न्यायाधिकार

उच्च न्यायालय, मुंबई, मुख्यालय मुंबई तसेच नागपूर व औरंगाबाद खंडपीठांच्या आस्थापनेवर **“वाहनचालक”** या पदाकरिता उमेदवारांची निवड यादी व प्रतिक्षा यादी, २ वर्षांकरिता तयार करण्यासाठी जाहिरात प्रसिध्दिच्या दिनांकास पात्रतेचे निकष व आवश्यक अटी पूर्ण करणा—या निरोगी व इच्छुक उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

| पदाचे नाव | आस्थापना | एकूण रिक्त पदे (सद्यस्थितीत रिक्त पदे + पुढील दोन वर्षात रिक्त होणारी पदे) | निवड यादी (एकूण पदे) | प्रतिक्षा यादी (एकूण पदे) | नियमाप्रमाणे वाहनचालक या पदाची वेतन मॅट्रिक्स |
|---|---|---|---|---|---|
| वाहन चालक | उच्च न्यायालय, मुंबई | २६ | २६ | ७ | एस—१० ₹ २९,२००— ₹ ९२,३०० व नियमाप्रमाणे भत्ते |
| | नागपूर खंडपीठ | ५ | ५ | १ | |
| | औरंगाबाद खंडपीठ | ६ | ६ | २ | |

## अ) पात्रता :—

१. उमेदवार कमीत कमी एस.एस.सी (दहावी) किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असावा.

२. उमेदवारास मराठी व हिंदी भाषा लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.

...२/—

३. वयोमर्यादा —

| प्रवर्ग | किमान वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|
| खुला प्रवर्ग | २१ | ३८ |
| महाराष्ट्र शासनाने निर्दिष्ट केलेल्या अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती, इतर मागासवर्ग किंवा विशेष मागासवर्गातील उमेदवारांसाठी | २१ | ४३ |
| विहीत मार्गाने अर्ज करणा—या न्यायालयीन कर्मचारी किंवा शासकीय कर्मचा—यांसाठी | २१ | लागू नाही |

४. उमेदवाराकडे जाहिरात प्रसिद्धीच्या दिनांकास व त्यानंतर मोटार वाहन अधिनियम १९८८ (क्र. ५९/१९८८) प्रमाणे वैध व कार्यरत असा किमान हलके मोटार वाहन (LMV) चालविण्याचा परवाना (ड्रायव्हींग लायसन्स) असावा.

५. उमेदवारास किमान ३ वर्ष हलके आणि/किंवा जड मोटार वाहन चालवण्याचा अनुभव असावा.

६. उमेदवाराचा वाहन चालविण्याचा पूर्व कार्यकाल (रेकॉर्ड) स्वच्छ असावा.

७. उमेदवारास मोटार वाहनाची देखभाल व सर्वसाधारण दुरूस्तीचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

८. उमेदवारास संबंधित (मुंबई/नागपूर/औरंगाबाद) शहराची स्वाभाविक रचना (Topography) माहित असावी.

९. उमेदवार शारीरिकदृष्टया सुदृढ आणि निर्व्यसनी असावा.

...३/—

## ब) पात्र उमेदवारीकरीताच्या अटी:—

१. उमेदवार भारताचा नागरिक असावा आणि महाराष्ट्र राज्याचा अधिवासी (Domicile) असावा.

२. त्याचे/तिचे चारित्र्य आणि वर्तणूक चांगली असावी.

३. तो/ती करार करणेस सक्षम असावा/असावी.

४. त्याला/तिला नैतिक पतनाच्या गुन्ह्यासाठी दोषी ठरवण्यात आले नसावे किंवा त्याला/तिला कोणत्याही न्यायालय/एम.पी.एस.सी. /यु.पी.एस.सी. किंवा कोणत्याही राज्य सेवा आयोगाने त्यांच्याद्वारे आयोजित केलेल्या परीक्षा निवडींमध्ये उपस्थित राहण्यापासून कायमचे काढून टाकले नसावे किंवा अपात्र ठरवले नसावे.

५. त्याला/तिला फौजदारी न्यायालयाने दोषी ठरवले नसावे किंवा त्याच्या/तिच्याविरुद्ध फौजदारी खटला प्रलंबित नसावा.

६. त्याला/तिला हयात असलेल्या पत्नी/पती ची संख्या एकापेक्षा जास्त नसावी.

७. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ नुसार, उमेदवारास अर्ज करण्याच्या दिनांकास, २८ मार्च २००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे, हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक नसावी.

## क) ऑनलाईन अर्ज भरण्याचे शुल्क :—

१. अर्जदाराने ऑनलाईन अर्ज करताना **परीक्षा शुल्क ₹ १,०००/—** भरणे आवश्यक आहे.

२. अर्ज शुल्क भरल्याशिवाय अर्जदारांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

३. भरलेले शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही.

## ड) ऑनलाईन शुल्क भरण्याची पध्दत:—

१. उमेदवाराला वरीलप्रमाणे परीक्षा **शुल्क** **‘SBI Collect’** द्वारे ऑनलाईन पेमेंट करणे आवश्यक आहे.

२. उमेदवारांना **‘SBI Collect’** सुविधेद्वारे ऑनलाईन पेमेंटसाठी **‘User Mannual’** मध्ये दिलेल्या निर्देशांचे पालन करणे आवश्यक आहे.

३. अर्ज स्वीकारण्यासाठी फक्त यशस्वी पेमेंट झालेल्या व्यवहारांचाच विचार केला जाईल. कोणत्याही परिस्थितीत परीक्षा शुल्क परत दिले जाणार नाही. उमेदवाराने परत न मिळणारे शुल्क भरल्याने त्याला/तिला परीक्षेला उपस्थित राहण्याचा कोणताही हक्क निर्माण होत नाही. तसेच, उमेदवाराने एकापेक्षा जास्त अर्जांच्या शुल्काचा भरणा केल्यास, कोणत्याही परिस्थितीत ते शुल्क परत दिले जाणार नाही.

४. **‘SBI Collect’** सुविधेद्वारे तयार केलेले नियम, अटी व शर्तीची कोणतीही जबाबदारी मुंबई उच्च न्यायालय प्रशासनाची नाही. ऑनलाईन पेमेंट करताना काही तांत्रिक बिघाड झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील. या बाबत कोणत्याही स्वरूपाची चौकशी/दाव्याची दखल घेतली जाणार नाही.

## इ) अर्ज करण्याची पध्दत :—

१. अर्ज सादर करतांना https://bombayhighcourt.nic.in या वेबसाईट वरील सुचनांचे काटेकोरपणे पालन करूनच अर्ज सादर करावा.

२. उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज हा शक्यतो वेब ब्राउझरच्या (Web Browsers) माध्यमातून संगणकावर भरावा.

३. प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकाराने अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

...५/—

४. पात्र उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज https://bombayhighcourt.nic.in या वेबसाईटद्वारे **दिनांक १५/१२/२०२५ ते दिनांक ०५/०१/२०२६** पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. **ऑनलाईन अर्जाची लिंक दिनांक १५/१२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडेल आणि दिनांक ०५/०१/२०२६ रोजी संध्याकाळी ५.०० वाजता बंद होईल**.

५. ऑनलाईन पद्धतीने अर्ज करताना उमेदवाराने स्वत:चा अद्यावत पासपोर्ट साईज चा **फोटो (३.५ सें.मी X ४.५ सें.मी)** व स्वत:ची **स्वाक्षरी (३ सें.मी X २.५ सें.मी)** स्कॅन करून ४० KB पेक्षा जास्त साईज होणार नाही अशा पद्धतीने दोन स्वतंत्र फाईल्स **jpg/jpeg format** मध्ये करून ऑनलाईन अर्जात दर्शविलेल्या ठिकाणी सदर फोटो व स्वाक्षरी अपलोड करणे अनिवार्य आहे. (**टिप.** फोटो व स्वाक्षरी अपलोड झाल्याची खात्री करावी). प्रवेशपत्रावर/अर्जावर दुसऱ्याचा फोटो/स्वाक्षरी असल्यास उमेदवारास निवडीच्या टप्प्यामध्ये प्रवेश दिला जाणार नाही.

६. उमेदवाराने https://bombayhighcourt.nic.in या वेबसाईट वर क्लिक करून **Recruitment** मध्ये **Staff-Car-driver** च्या **Apply Online** पर्याय (option) वर क्लिक करावे तद्नंतर **SBI Collect** द्वारे ऑनलाईन **शुल्क ₹ १,०००/—** भरावे तद्नंतर **SB Collect Reference No.** प्राप्त होईल जो ऑनलाईन अर्जामध्ये अचूक नमूद करावा अन्यथा सदर अर्ज नाकारण्यात येईल. तसेच यासंदर्भातील कोणतीही निवेदने स्वीकारली जाणार नाहीत.

७. ऑनलाईन अर्ज करताना उमेदवाराने फक्त **एकाच आस्थापनेची निवड** करावी (उदा. मुख्यालय मुंबई किंवा नागपूर खंडपीठ किंवा औरंगाबाद खंडपीठ). एकदा आस्थापनेची निवड करून अर्ज सादर केल्यानंतर, आस्थापनेत बदल करण्याची विनंती कोणत्याही परिस्थितीत स्वीकारली जाणार नाही. म्हणून उमेदवारांनी आस्थापनेची निवड करताना योग्य काळजी घ्यावी.

**नियुक्तीनंतर उमेदवारास नियुक्तीच्या दिनांकापासून ५ वर्षांची सेवा पूर्ण होईपर्यंत कोणत्याही ठिकाणी बदलीसाठी अर्ज करता येणार नाही.**

...६/—

८. उमेदवाराने आपली सर्व माहिती योग्यरित्या भरून झाल्यावर सर्वात शेवटी **I Agree** बटणावर क्लिक करून अर्ज सादर (Submit) करावा. (एकदा माहिती सादर (Submit) केल्यानंतर उमेदवाराला ऑनलाईन अर्जामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही. तसेच त्यासंदर्भात उच्च न्यायालय प्रशासनाकडून कोणतीही तक्रार/दावा विचारात घेतला जाणार नाही किंवा ऐकला जाणार नाही).

९. उमेदवारांनी संपूर्ण जाहिरातीचे वाचन करूनच अर्ज भरावा. संपूर्ण भरलेला अर्ज सादर **(Submit)** केल्यानंतर उमेदवाराने **Print Application** मध्ये जाऊन Registration ID Number व Date of Birth टाकून Print काढून त्या **Printout** वर दिलेल्या जागेवर स्वत:चा अर्ज भरतांना **Upload** केलेला फोटो चिटकवावा आणि विहित जागेवर काळया पेनाने स्वाक्षरी करावी. सदरील अर्जाचे **Printout** स्वत:कडे जतन करून ठेवावे. सदरील अर्ज आणि शैक्षणिक कागदपत्रे या कार्यालयात **पोस्टाने पाठवू नये**. मात्र निवड प्रक्रियेदरम्यान दिलेल्या सूचनेनुसार आवश्यक त्यावेळी सदरील अर्जाची प्रत उपलब्ध करावी.

१०. ऑनलाईन अर्ज भरत असताना आपण जाहिरातीतील नमूद शैक्षणिक पात्रता/अनुभव/इतर बाबींची पूर्तता केली असेल तरच आपला अर्ज स्विकारला जाईल.

११. **उमेदवाराने एकापेक्षा जास्त ऑनलाईन अर्ज सादर केल्यास त्याचा/तिचा फक्त शेवटचा अर्ज व त्यासोबत भरलेले परीक्षा शुल्क विचारात घेतले जाईल.** याआधी सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी अर्ज भरतानाच काळजीपूर्वक भरावा.

## फ) निवड प्रक्रिया:—

पात्र उमेदवारांना खालील निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल.

| क्र. | परीक्षेचा प्रकार | गुण | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|
| १) | लेखी परीक्षा | २० गुण<br>(उत्तीर्ण गुण किमान ७) | लेखी चाचणीसाठी प्रश्नपत्रिकेमध्ये खालील विषयांवर वस्तुनिष्ठ नानाविध निवडीचे प्रश्न असतील<br>**(i.e. objective type, multiple choice questions) :-**<br>**अ)** वाहनांची देखभाल व किरकोळ दुरूस्ती विषयक ज्ञान.<br>**ब)** संबंधित (मुंबई/नागपूर/औरंगाबाद) शहर व त्यालगतची महत्वाची स्थळे व रस्त्यांची माहिती.<br>**क)** सामान्य ज्ञान. |
| २) | पूर्वानुभव | १० गुण | —— |
| ३) | मोटार वाहन परीक्षा (प्रादेशिक परिवहन कार्यालय अधिकाऱ्यांमार्फत) | १० गुण<br>(उत्तीर्ण गुण किमान ७) | —— |
| ४) | मुलाखत | १० गुण | —— |
| | **निवड प्रक्रियेचे एकुण गुण** | **५० गुण**<br>**(उत्तीर्ण गुण किमान २५)** | |

**नोंद—** वरील सर्व परीक्षांसाठीचे वेळापत्रक मुंबई उच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.

**ग) ज्या उमेदवारांना मुलाखतीकरीता बोलवण्यात येईल, त्यांनी खालील कागदपत्रांच्या प्रमाणित केलेल्या छायांकित प्रती त्यांच्या मूळ प्रमाणपत्रांसह पडताळणीसाठी मुलाखतीच्या वेळी सोबत आणाव्यात :**

१. जन्मतारखेच्या पुराव्याचा दाखला (शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र/जन्म प्रमाणपत्र/एस.एस.सी. चे बोर्ड प्रमाणपत्र).

२. शैक्षणिक पात्रतेच्या परीक्षेचे गुणपत्रक. (१०वी किंवा तत्सम परीक्षा, १२वी किंवा तत्सम डिप्लोमा कोणत्याही मान्यता प्राप्त बोर्ड किंवा विद्यापीठातून प्राप्त केलेला, इत्यादी).

(**नोंद :—** काही बोर्डाच्या गुणपत्रिका टक्केवारीऐवजी ग्रेडच्या स्वरुपात दिल्या जातात. या प्रकरणात, उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विषयनिहाय मिळालेले गुण, एकुण गुण आणि टक्केवारी असलेले गुणपत्रक संबंधित शाळा/बोर्डातून मिळवावे आणि ते गुण संबंधित रकान्यात दिलेल्या सूचनांनुसार भरावे. सदर गुणपत्रक उच्च न्यायालय प्रशासनाने वेळोवेळी मागविल्यास सादर करावे.)

३. शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र. (१० वी किंवा तत्सम परीक्षा, १२ वी किंवा तत्सम डिप्लोमा कोणत्याही मान्यता प्राप्त बोर्ड किंवा विद्यापीठातून प्राप्त केलेला, इत्यादी)

४. जाहिरात प्रसिध्दी नंतरची तारीख असलेली दोन प्रतिष्ठित व्यक्तींनी दिलेली चारित्र्य संपन्नतेविषयीचे प्रमाणपत्र.
(अर्जासोबत ऑनलाईन **Form-A** नमुन्यात)

५. वैध वाहन परवान्याची (ड्रायव्हींग लायसन्स) प्रत.

६. मोटार वाहन चालविण्याचे किमान ३ वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र. प्रमाणपत्रावर जारी करणाऱ्या संस्थेचे/व्यक्तीचे नावं, स्वाक्षरी, पत्ता तसेच संस्थेचा शिक्का असणे आवश्यक आहे.

७. सक्षम अधिकाऱ्याने प्रदान केलेला जातीचा दाखला (मागासवर्गीय उमेदवारांसाठी).

८. महाराष्ट्रात अधिवास (Domicile) करीत असल्याबाबतचे सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे.

९. रोजगार विनिमय (Employment Exchange) कार्यालयात नोंदणी केली असल्यास, नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

१०. उमेदवार शासकीय कर्मचारी असल्यास सक्षम प्राधिकाऱ्यांची (कार्यालयाची) मंजूरी घेतल्याचे ना—हरकत प्रमाणपत्र आवश्यक राहील.

११. उमेदवाराच्या नावात बदल असेल तर त्याच्या/तिच्या नावाच्या बदलाबाबत दस्तऐवज जसे की, शासकीय राजपत्र, सक्षम प्राधिकरणाने जारी केलेल्या विवाह प्रमाणपत्राची प्रत इत्यादी.

१२. संबंधीत इतर आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने.

१३. न्यायालय प्रशासनाने मागणी केल्यास इतर कोणतेही दस्तऐवज.

## ह) उमेदवारांकरीता इतर महत्वाच्या सूचना :—

१. परीक्षेचा प्रकार, परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे, याबाबत सर्व अधिकार प्रशासन, उच्च न्यायालय, मुंबई यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

२. सदरहू जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या पद संख्येत बदल होण्याची शक्यता आहे. कोणत्याही कारणास्तव पदे कमी/जास्त झाल्यास निवड केलेल्या उमेदवारास नियुक्तीबाबत हक्क प्रस्थापित करता येणार नाही अथवा निवड प्रक्रिया रद्द झाल्यास कोणताही दावा सांगता येणार नाही.

३. अर्जदार जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पात्रता व अटी शर्तीनुसार पात्र आहे असे समजून त्याला लेखी परीक्षेकरीता तात्पुरता प्रवेश देण्यात येईल. मुलाखती/नियुक्ती पूर्वी उमेदवाराची जाहिरातीनुसार पात्रता तपासण्यात येईल. त्यावेळी उमेदवार अपात्र आढळल्यास त्याला मुलाखतीसाठी/नियुक्तीसाठी अपात्र ठरवले जाईल. याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील.

४. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांच्या संख्येनुसार व उमेदवाराच्या शैक्षणिक पात्रता व त्यातील गुणवत्तेनुसार **अल्पसुची (Shortlisting)** करण्याचे व त्यानुसार लेखी परीक्षेसाठी आणि/किंवा निवड प्रक्रियेच्या कुठल्याही टप्प्यावर, पात्र उमेदवारांची निवड करण्यासाठी गुणमर्यादा ठरविण्याचे सर्व अधिकार प्रशासन, उच्च न्यायालय यांनी आपल्याकडे राखून ठेवले आहेत.

..१०/—

५. केवळ अर्ज दाखल केला यावरून मुलाखतीचा किंवा नेमणूकीचा हक्क प्रस्थापित होणार नाही. तसेच उमेदवाराची उच्च शैक्षणिक पात्रता हा सदर पदाच्या निवडीसाठी मुख्य आधार मानला जाणार नाही.

६. परीक्षेच्यावेळी उमेदवाराने प्रवेश प्रमाणपत्र आणि पडताळणीसाठी स्वत:चे आधारकार्ड/पॅनकार्ड/वाहन परवाना इ. ओळखपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

७. मोटार वाहन परीक्षा तसेच मुलाखतीसाठी बोलावण्यात येणाऱ्या उमेदवारांनी त्यांनी अर्जामध्ये नमूद व दाखल केलेल्या कागदपत्रांच्या मूळ प्रती पडताळणीसाठी आणाव्यात. तसेच या कार्यालयास मान्य होईल असे स्वत:चे फोटो प्रमाणपत्र **(Photo ID)** जसे मतदार कार्ड, पॅन कार्ड, आधार कार्ड, वाहन परवाना यापैकी एखादा पुरावा आणावा.

८. पात्र उमेदवारांना (नेमलेल्या तारखांना) लेखी परीक्षा, मोटार वाहन परीक्षा, मूळ प्रमाणपत्र तपासणी व मुलाखतीसाठी **स्व:खर्चाने** हजर राहावे लागेल.

९. कार्यालयाच्या नियंत्रणाबाहेरील कोणत्याही अनपेक्षित घटनेमुळे भरती प्रक्रियेचे वेळापत्रक बदलू शकते असा बदल वेळोवेळी उच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केला जाईल. त्याकरीता **उमेदवारांनी उच्च न्यायालय, मुंबईच्या अधिकृत संकेतस्थळावर लक्ष ठेवावे.**

१०. उमेदवाराला कोणत्याही बदलाबाबतीची सूचना उशीरा मिळाल्यामुळे नियोजित तारखेस व वेळेस लेखी परीक्षेस, मोटारवाहन परीक्षेस, मूळ प्रमाणपत्र तपासणीस किंवा मुलाखतीस उमेदवार अनुपस्थित राहिल्यास, उच्च न्यायालय प्रशासनाकडून या बाबत कोणतीही तक्रार/दावा विचारात घेतला जाणार नाही किंवा ऐकला जाणार नाही.

११. उमेदवाराने नोकरीसाठी केलेल्या अर्जात नमूद केलेली माहिती ही अंतिम समजण्यात येईल. अर्जातील माहिती बदलाबाबत नंतर कोणत्याही प्रकारचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत अथवा बदल विचारात घेतले जाणार नाहीत.

...११/—

१२. निवड प्रक्रिया सुरु झालेनंतर उमेदवारांची निवड झाल्यावर किंवा नियुक्ती दिल्यानंतर कोणत्याही क्षणी अर्जदाराने अर्जात व परीक्षेचे वेळी दिलेली माहिती अगर बनावट कागदपत्रे सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास, त्या उमेदवारांची उमेदवारी, निवड, नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

१३. अल्पसुचीत पात्र उमेदवारांसाठी लेखी परीक्षा, मोटार वाहन परीक्षा तसेच मुलाखतीचे वेळापत्रक मुंबई उच्च न्यायालयाचे अधिकृत संकेतस्थळावर वेळोवेळी प्रदर्शित करण्यात येईल. उमेदवाराने परीक्षेचे प्रवेश प्रमाणपत्र **'Admit Card'** वर क्लीक करून प्रिंट काढून घ्यावे.

१४. उमेदवाराने लेखी परीक्षा तसेच मोटारवाहन परीक्षेमध्ये मिळविलेल्या गुणांच्या आधारे, तसेच त्याच्या अर्जाची छाननी व त्याने मुलाखतीचे वेळेस हजर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर उमेदवारांची मुलाखतीची पात्रता अंतिमरित्या ठरविण्यात येईल. फक्त पात्र उमेदवारांचीच मुलाखत घेण्यात येईल.

१५. उमेदवारांची निवड ही लेखी परीक्षा, मोटार वाहन परीक्षा, पूर्वानुभव आणि मुलाखतीत मिळालेल्या गुणांच्या (Merit) आधारे केली जाईल.

१६. मंजूर केलेली **निवड यादी व प्रतिक्षा यादी** ही प्रसिद्धीच्या दिनांकापासून फक्त २ वर्षासाठीच वैध राहील. त्यास मुदतवाढ न दिल्यास सदरची निवड यादी व प्रतिक्षा यादी रद्द करण्यात येईल.

१७. निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती ही उच्च न्यायालयामार्फत करण्यात येणा—या उमेदवारांच्या वैद्यकीय तपासणी आणि संबंधित पोलीस स्टेशनकडून चारित्र्य पडताळणीच्या अहवालांवर अवलंबून असेल.

१८. निवड/प्रतिक्षा यादीतील उमेदवार नियुक्ती आदेशात नमूद केलेल्या कालावधीत कर्तव्यात सामील होऊ शकला नाही तर त्याचे/तिचे नाव निवड/प्रतिक्षा यादीतून काढून टाकले जाईल.

...१२/—

१९. निवड यादीतील उमेदवार नियुक्तीच्या पदावर रूजू होण्यासाठी दिलेल्या कालावधीत रूजू न झाल्यामुळे रिक्त झालेल्या पदावर किंवा निवड यादीतील उमेदवाराने पद स्वीकारल्यानंतर त्या यादीच्या वैधतेच्या कालावधीत राजीनामा दिल्यास किंवा तत्सम कारणामुळे पद रिक्त झाल्यास जर त्यावेळेस निवड यादी संपली असेल, तरच प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचा विचार करण्यात येईल.

२०. निवड/प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची नियुक्ती सुरूवातीला दोन वर्षांच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल. परिविक्षाधीन कालावधी समाधानकारक पूर्ण झाल्याबद्दल प्रमाणपत्र जारी होईपर्यंत सदर उमेदवाराची सेवा कोणत्याही वेळी, कोणतीही नोटीस न देता किंवा कोणतेही कारण न देता समाप्त केली जाईल.

२१. **उमेदवाराने निवड समितीच्या सदस्यांना किंवा उच्च न्यायालयात काम करण्या—या अधिका—यांना/कर्मचा—यांना भेटण्याचा किंवा त्यांच्यावर त्याच्या निवड प्रक्रियेसंबंधी व्यक्तीशः अथवा इतर कोणामार्फत दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याला/तिला निवड प्रक्रियेमधून अपात्र ठरविण्यात येईल व यासंबंधी निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.**

२२. याद्वारे सुचित करण्यात येते की, निवड प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर आवश्यक ते बदल करण्याचा सर्वाधिकार उच्च न्यायालयाच्या अधीन राहील.

२३. या निवड प्रक्रियेत निवड समितीने घेतलेला निर्णय हा अंतिम असेल.

**आदेशावरुन**

**सही/—**

**महाप्रबंधक**

**दिनांक : ८ डिसेंबर, २०२५** **मुंबई येथील उच्च न्यायालयाचा न्यायाधिकार**

# <u>ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी मार्गदर्शक सूचना</u>

१) संगणकीकृत प्रोग्रामद्वारे ऑनलाईन अर्जाची छाननी केली जाईल म्हणून ऑनलाईन अर्ज भरणे सुरु करण्यापूर्वी उमेदवाराने वाहनचालक पदासंबंधीची संपूर्ण जाहिरात काळजीपूर्वक वाचावी. ऑनलाईन अर्ज हा इंग्रजी भाषेत भरला जाईल.

२) ऑनलाईन अर्जातील माहिती भरण्यापूर्वी उमेदवाराने परीक्षा शुल्क **₹ १,०००/— 'SBI Collect'** द्वारे ऑनलाईन पेमेंट गेटवे (Payment Gateway) या सुविधेद्वारे ऑनलाईन शुल्क भरावे तद्नंतर **SB Collect Reference No.** प्राप्त होईल तद्नंतर ऑनलाईन अर्ज भरावा.

३) ऑनलाईन अर्ज हा शक्यतो वेब ब्राउझरच्या (Web Browsers) माध्यमातून संगणकावर भरावा.

४) ऑनलाईन अर्जातील संपूर्ण माहिती अचूक भरणे उमेदवारास बंधनकारक आहे.

५) ऑनलाईन अर्ज भरणे सुरु करण्यापूर्वी उमेदवाराने स्वत:चा अद्यावत पासपोर्ट फोटो आणि स्वाक्षरी स्वतंत्र स्कॅन करुन **४०KB** पेक्षा कमी आकार होईल अशी **.jpg/.jpeg format** मध्ये दोन वेगवेगळया फाईल्स तयार ठेवाव्यात.

६) ऑनलाईन अर्ज करताना उमेदवाराने फक्त एकाच आस्थापनेची निवड करावी (उदा. मुख्यालय मुंबई किंवा नागपूर खंडपीठ किंवा औरंगाबाद खंडपीठ).

७) उमेदवाराने माहिती भरताना संपूर्ण नावाचे (spelling) त्याच्याजवळ उपलब्ध असलेल्या शैक्षणिक कागदपत्रानुसार अचूक नमूद करावे.

८) उमेदवाराने पत्रव्यवहाराचा अचूक पत्ता पिनकोडसहीत द्यावा. अर्धवट पत्ता देऊ नये.

९) उमेदवाराने उपयोगात असलेलाच ईमेल आयडी (email ID) व मोबाईल क्रमांक द्यावा.

१०) उमेदवाराने आपली जन्मतारीख, शैक्षणिक कागदपत्रे/ जन्मप्रमाणपत्राद्वारे अचूक लिहावी.

११) उमेदवाराने स्वत:चा आधार कार्ड क्रमांक अचूक नमूद करावा.

१२) उमेदवाराने त्याच्या शैक्षणिक कागदपत्रांच्या आधारे अर्जात अचूक शैक्षणिक माहिती भरावी. शैक्षणिक पात्रतेबाबत माहिती भरताना उमेदवाराने त्याची पात्रता खाली दिलेल्या क्रमानुसार नमूद करावी.

१. एस.एस.सी. (S.S.C.) किंवा तत्सम परीक्षा
२. एच.एस.सी. (H.S.C.) किंवा तत्सम डिप्लोमा कोणत्याही मान्यता प्राप्त बोर्ड किंवा विद्यापीठातून प्राप्त केलेला.

(**नोंद:—** काही बोर्डाच्या गुणपत्रिका टक्केवारीऐवजी ग्रेडच्या स्वरुपात दिल्या जातात. या प्रकरणात, उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विषयनिहाय मिळालेले गुण, एकुण गुण आणि टक्केवारी असलेले गुणपत्रक संबंधित शाळा/बोर्डातून मिळवावे आणि ते गुण संबंधित रकान्यात दिलेल्या सूचनांनुसार भरावे.)

१३) उमेदवारास ज्या भाषांचे ज्ञान आहे ती भाषा निवड (select) करावी.

१४) उमेदवाराने वाहन चालविण्याच्या अनुभवाबाबतची माहिती नमूद करावी.

१५) उमेदवाराने त्याच्याकडे असणाऱ्या वैध वाहन परवान्याची संपूर्ण व अचूक माहिती भरावी.

१६) उमेदवाराकडे वाहनांची देखभाल व किरकोळ दुरूस्तीचे ज्ञान/अनुभव असल्यास त्याबद्दलची माहिती भरावी.

१७) उमेदवाराविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल झाला असल्यास किंवा पुर्वी एखाद्या प्रकरणात फौजदारी न्यायालयाने शिक्षा ठोठावली असल्यास त्याबाबत सविस्तर माहिती द्यावी तसेच न्यायालयीन कर्मचारी किंवा शासकीय कर्मचारी यांचेवर कोणतीही विभागीय चौकशी प्रलंबित असल्यास तसे अर्जात नमूद करावे. खरी माहिती दडवून ठेवल्यास उमेदवार नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरेल. नियुक्तीनंतर सदर माहिती प्रशासनाच्या निदर्शनास आल्यास उमेदवारास कोणतीही पूर्वसूचना न देता नोकरीवरुन कमी केले जाईल.

...३/—

१८) उमेदवाराने त्याला/तिला ओळखत असलेल्या दोन प्रतिष्ठित व्यक्तींकडून चांगली वर्तणूक व चारित्र्याबाबतचा दाखला (ऑनलाईन जाहिरातीसोबत जोडलेल्या **Form 'A'** नमुन्यात) प्राप्त करावा आणि अर्ज भरतांना सदरील व्यक्तींची माहिती अर्जात नमूद करावी. सदरील दाखला हा जाहिरात प्रसिध्दीनंतरच्या तारखेचा असावा. सदरील प्रतिष्ठित व्यक्ती ही उमेदवाराची जवळची नातेवाईक/मित्र नसावी.

१९) उमेदवाराने ऑनलाईन अर्जात योग्य त्या ठिकाणी, **४० KB** पेक्षा कमी आकार असलेल्या स्वत:च्या स्कॅन **फोटोची** jpg/jpeg format मधील फाईल Upload करावी. सदरील स्कॅन फोटो स्पष्ट दिसणारा असावा.

२०) उमेदवाराने अर्जात योग्य त्या ठिकाणी, **४० KB** पेक्षा कमी आकार असलेल्या स्वत:च्या स्कॅन **स्वाक्षरी** jpg /jpeg format मधील फाईल Upload करावी. सदरील स्कॅन स्वाक्षरी स्पष्ट दिसणारी असावी.

२१) अर्ज Submit करण्यापूर्वी उमेदवाराने भरलेला अर्ज बरोबर आहे याची खात्री करावी, Declaration चे वाचन करावे व नंतरच **I Agree** या बटणावर Click करावे. अर्ज **Submit** झाल्यावर उमेदवारास अर्जात कोणताही बदल करता येणार नाही.

२२) अर्ज Submit झाल्यानंतर येणारा **Registration ID Number** उमेदवाराने नमूद करुन घ्यावा आणि **Print Application** हा पर्याय (option) Select करुन ऑनलाईन अर्जाची Print out काढावी.

२३) सदरील Print out काढल्यानंतर शेवटी दिलेल्या जागेवर उमेदवाराने आपला स्वत:चा फोटो चिटकवावा आणि सोबतच्या रकान्यामध्ये **काळया** पेनाने स्वत:ची सही करावी. सदरील Print out उमेदवाराने पुढील कार्यवाहीसाठी स्वत:जवळ जतन करुन ठेवावी.

**आदेशावरुन**

**सही/—**

**महाप्रबंधक**

**दिनांक : ८ डिसेंबर, २०२५** **मुंबई येथील उच्च न्यायालयाचा न्यायाधिकार**

**Form 'A'**

**नमुना 'अ'**

**चारित्र्य (वर्तणूक) प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती/कुमारी ..................................................................................... हे/हया........................................................................... तालुका...................., जिल्हा................., येथील रहिवासी असून, मी त्यांना मागील ............... वर्षापासून ओळखतो, त्यांची वर्तणूक व चारित्र्य चांगले आहे. ते/त्या माझे/माझ्या नातेवाईक नाहीत.

करिता सदरील वर्तणूक/चारित्र्य प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

ठिकाण:—.................. प्रमाणपत्र देणाऱ्याचे नाव, व्यवसाय, सही,

दिनांक:—................. पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक :

सही :—.......................................

नाव :—.......................................

व्यवसाय:—...................................

पत्ता :—.......................................

.......................................

.......................................

भ्रमणध्वनी क्रमांक :—.......................